NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

दिनांक २७.१०.२०२६ मंगळवार

(कामगिरी)

१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :–

दिनांक २६.१०.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०६ केसेसमध्ये ०६ ईसमावर कारवाई करून एकुण १३,०८०/–रू. चा मुद्देमाल जप्त केला. तसेच, जुगार कायद्यान्वये ०४ केसेसमध्ये १० ईसमांवर कारवाई करून, एकुण ५३,५४५/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये, ओव्हरस्पीड वाहन चालविणे कलम १८४ मोवाका अन्वये ३७ केस, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये ३२ केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १३० मोवाका अन्वये १२९ केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये २९२ केसेस, रॉग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये ८१ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४(ए) मोवाका अन्वये १४५ केसेस, ड्रायव्हींग विदाऊट युनिफार्म कलम २१/१८ मोवाका अन्वये १०४ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये ६८ केसेस, धोकादायकरित्या बेदरकारपणे वाहन चालविणे कलम १८४ मोवाका अन्वये ०९ केस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये ३० केसेस, विदाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४ बी(१) मोवाका अन्वये ३० केसेस, विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये ९९२ केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे कलम १८४(सि) अन्वये ११ केस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये २६ केसेस व इतर कलमांखालील वेगवेगळे गुन्हे असे एकुण २,१७६ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. ९,२७,४००/–रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

२) कळमना पोलीसांची कामगिरी :– दुकान फोडुन चोरी करणाऱ्या ०३ आरोपींना अटक.

पोलीस ठाणे कळमना हद्दीत, प्लॉट नं. सि/२, पावनगांव रोड, नर्मदा नगर येथे राहणारे फिर्यादी विवेक शंकर शाहु, वय २७ वर्षे यांचे ''तिरूपती मेटल्स स्क्रॅप'' नावाचे दुकान आहे. दिनांक १३.१०.२०२६ चे २२.०० वा. ते दिनांक १४.१०.२०२६ चे १०.०० वा. चे दरम्यान, फिर्यादी आपले दुकान बंद करुन घरी गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे दुकानात प्रवेश करून, दुकानातील काउंटरमधिल रोख १०,०००/–रू. तसेच, तांबा पितळीचे स्क्रॅप वजनी १४० किग्रॅ. असा एकुण किंमती १,६४,०००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमना येथे अज्ञात आरोपींविरूध्द कलम ३०५(अ) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान कळमना पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रीक तपास करून, मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, आरोपी हे वरोरा, जि. चंद्रपुर येथील असल्याचे निष्पन्न केले व सापळा रचुन आरोपी क्र. १) व्यंकटेश हरी बदखल, वय ३१ वर्षे, २) मनोहर नारायण दांडेकर, वय ३८ वर्षे, ३) भिमा रामदास दांडेकर, वय ४२ वर्षे, तिघेही रा. हनुमान वार्ड, पंकज टॉकीज जवळ, यात्रा वार्ड, वरोरा, जि. चंद्रपुर यांना ताब्यात घेवुन, विचारपुस केली असता, त्यांनी वर नमुद चोरी संगणमताने केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन गुन्ह्यातील मुद्देमाल तांबा पितळीचे स्क्रॅप व गुन्ह्यात वापरलेले टाटा पिकअप वाहन एम.एच ४० सि.टी १९३२ असा एकुण ४,५४,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपींना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग), मा. श्री. नित्यानंद झा पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ सहा. पोलीस आयुक्त (कळमना विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. प्रविण काळे, पोनि. करीम पठाण, सपोनि. अजय जाधव, पोहवा. रविकुमार शाहु, प्रदीप कुमार, पोअं. मंगेश लेाही, संतोष पांडे, अनिल जाधव, प्रफुल्ल गोहोकार व प्रविण ईनवाते यांनी केली.



३) नविन कामठी पोलीसांची कामगिरी :— जबरी चोरीचा प्रयत्न करणाऱ्या आरोपींना अटक.

दिनांक २६.१०.२०२६ चे ०३.३० वा. चे सुमारास, नविन कामठी पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना सुचना मिळाली की, चौधरी हॉस्पीटल समोर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या जवळ, कन्हान कामठी रोड येथे मेट्रो कर्मचारी यांना शस्त्राचा धाक दाखवुन, जबरी चोरी करण्याचा प्रयत्न होत आहे. अशा माहीतीवरून, नमुद ठिकाणी पोहचले असता, एक ईसम हातात लोखंडी तलवार घेवनु उभा व दुसरा ईसम ईलेक्ट्रीक ऑटोमध्ये मेट्रोचे लोखंडी साहीत्य टाकतांना दिसला. पोलीसांनी घेराव टाकुन दोन्ही आरोपींना ताब्यात घेतले व निशस्त्र केले. आरोपी हे मेट्रोचे सुरक्षा रक्षम नामे ज्ञानेश्वर महल्ले, वय ६० वर्षे, रा. नाका नं. २, खसाळा, नागपुर यांना तलवारीचा धाक दाखवुन, मेट्रोचे साहित्य जबरीने चोरी करण्याचा प्रयत्न करीत होते. पंचासमक्ष आरोपींना त्यांची नांव पत्ता विचारले असता, त्यांनी आपली नावे १) आकाश कचरूजी हाटे, वय ४० वर्षे, रा. मोदी पडाव, खलाशी लाईन, कामठी, जि. नागपुर २) आकाश मातादिन बरसे, वय ३८ वर्षे, रा. निमखेडा, तारसा, मौदा, नागपुर असे सांगीतले. आरोपींचे ताब्यातुन ०१ लोखंडी तलवार, ०१ मोबाईल फोन व ईलेक्ट्रीक ऑटो असा एकुण ६०,३००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींना ताब्यात घेवुन पोलीस ठाणे येथे आणुन त्यांचा गुन्हे अभिलेख तपासला असता, आरोपी क्र. १ हा रेकॉर्डवरील आरोपी असल्याचे दिसुन झाले. दोन्ही आरोपींविरूध्द पोलीस ठाणे नविन कामठी येथे कलम ३१२, ३(५) भा.न्या.सं.,

सहकलम ४, २५ भा.ह.का, सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपींना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रमेश धुमाळ पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ६), मा. श्री. अंकुश खेडकर, सहायक पोलीस आयुक्त (कामठी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. श्री. महेश आंधळे, पोउपनि. विकास तिडके, सफौ. किशोर महंत व त्यांचे पथकातील अंमलदार यांनी केली.

(गुन्हे)

१) पोलीस ठाणे लकडगंज :–शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.

दिनांक २६.१०.२०२६ चे १९.४५ वा. चे सुमारास, लकडगंज पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, बजरंग स्टेअर्स जवळ, गंगाजमुना वस्ती येथे पांढरे निळे रंगाचे हाफ टि–शर्ट व काळा फुलपॅन्ट घातलेला इसम शस्त्रासह फिरत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, प्राप्त वर्णनाचा इसम पोलीसांना पाहुन पळु लागला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव दुर्गेश प्रितम इंगोले, वय २० वर्षे, रा. प्लॉट नं. ५८, शाहु मोहल्ला, हरीहर मंदीर जवळ, लकडगंज, नागपूर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे कंबरेत पॅन्टचे आंत एक लोखंडी चाकु किंमती २००/– रू. चा मिळुन आल्याने, जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगुन समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी पोअं. कुणाल मसराम यांनी दिलेल्या तक्रारीवरून, पोलीस ठाणे लकडगंज येथे पोउपनि. शेख यांनी आरोपीविरूध्द कलम ४, २५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

२) पोलीस ठाणे पाचपावली :– चोरी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

फिर्यादी आयुष संजीव कोहली, वय २९ वर्षे, रा. प्लॉट क्र. ३०६, शिव गोविंद लोटस अपार्टमेंट, झिंगाबाई टाकळी, गोधनी रोड, मानकापुर नागपुर हे इलास्टीक रन (एन्टेक्स ट्रान्स्पोर्टेशन प्राय. लि.) चे एरीया मॅनेजर आहेत. त्यांचे पोलीस ठाणे पाचपावली हद्दीत बाबा बुध्दाजी नगर, गुरूद्वाराजवळ टेका नाका येथे ऑफीस आहे. दिनांक २४.१०.२०२६ चे २०.०० वा. चे सुमारास फिर्यादी यांना मोबाईल चा खाली डब्बा मिळाल्याने त्यांना कोणीतरी चोरी केल्याचा संशय आला. त्यांनी कार्यालयातील सिसिटीव्ही चेक केले असता, दिनांक १३.१०.२०२६ चे ११.२० ते दि. २४.१०.२०२६ चे २०.०० वा. चे दरम्यान, त्यांचे ऑफीसमधील काम करणारे १) शोएब अफसर हुसैन, वय २८ वर्षे, २) नजीर शेख, वय २१ वर्षे दोन्हीही रा. रेहमत नगर, शही कब्रस्तान जवळ, सिस्टर कॉलोनी रोड, चंद्रपुर यांनी पार्सल शॉर्ट आऊट करतांना संगणमत करून, सिलबंद पार्सलमधुन मोबाईल चोरी केल्याचे दिसुन आले. रेकॉर्ड तपासला असता, सॅमसंग कंपनीचे ०५ मोबाईल फोन, मोटोरोला, नोवा, एमएचडी तसेच, आयफोन १७ मोबाईल व कार्लीटन कंपनीचे घड्याळ असा एकुण ४,२६,००५/–रू. चा मुद्देमाल चोरी केल्याचे दिसुन आले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे पाचपावली येथे पोउपनि. प्रदीप कुंभारे ७०३८६८६११७ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०६, ३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपींचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

(मिसींग)

पोलीस ठाणे धंतोली :– फिर्यादी दुर्गेश नरेश अहीर, वय ४२ वर्षे, रा. कुंभारटोली, कुर्वेज स्कुल जवळ, धंतोली, नागपूर यांनी पोलीस ठाण धंतोली येथे तक्रार दिली की, त्यांची मावशी नामे श्रीमती मुन्नी प्रेमलाल यादव, वय ५७ वर्षे, रा. बोरदही, तह. बैतुल, जि. मुलताई (मध्य प्रदेश) ह्या दिनांक १५.०९.२०२६ रोजी सकाळी ०८.००

वा. पासुन पोलीस ठाणे धंतोली हद्दीतील फिर्यादीचे राहते घरून बेपत्ता झाल्या आहेत. त्यांचा शोध घेतला असता, मिळून आल्या नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांना फुस लावून पळवून नेले असावे. अशा फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे धंतोली येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भान्यासं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **बेपत्ता व्यक्तीचे वर्णन** रंग–गोरा, चेहरा–लांबट, बांधा–सडतातळ, उंची–५ फुट १ इंच, केस–काळे पांढरे व लांब, अंगात– पांढरा गाऊन घातलेले आहे सोबत गुलाबी रंगाचे ब्लॅकेट घेतलेले आहे. भाषा– हिंदी बोलतात.



श्रीमती मुन्नी

(ईतर)

आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

अ	कोर्टाचे नाव	केस क्र.	कलम	आरोपीचे नाव व पत्ता	पेशी तारीख
१.	मा. जिल्हा व अती. सत्र न्यायाधिश–२, नागपुर.	९७०/२०२५	कलम २९४, ३३२, ३५३, १८६, ३४ भा.दं.वि.	स्वप्नील दिलीप डोंगरे, वय २० वर्षे, रा. अनमोल नगर, खरबी, नंदनवन, नागपुर.	२९.१०.२०२६
२.	मा. ९ वे सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर.	५०८९/२०२१	कलम ३८१, ४११ भा.दं.वि.	सरीता संतोष मसराम, वय ३५ वर्षे, रा. सरकारी दवाखाना चे मागे, चौधरी चे घरी किरायाने, कन्हान, नागपुर.	०३.११.२०२६
३.	मा. जिल्हा व अती. सत्र न्यायाधिश–१७, विशेष न्यायाधिश पोक्सो कोर्ट, नागपुर.	१८४/२०२३	कलम ३५४(अ) भा.दं.वि., सहकलम ८ पोक्सो	विनय व्यंकटेश फुटाणे, रा. बि/१०२, उदयन अपार्टमेंट, उज्वल नगर, वर्धा रोड, सोनेगांव, नागपुर.	३१.१०.२०२६

स्वा/–

(अंकुश राठोड)

पोलीस उप निरीक्षक,

पोलीस जनसंपर्क अधिकारी,

नागपुर शहर.